मासिक
# स्वराज दुनिया

संपादक : शिवाजी बबन खेडकर मो. नं. ८०५५७२२११०

■ RNI No. : MAHMAR/2024/89748
■ DECL NO : SDM/SR/06/2024 Dt. : 16/02/2024
■ unoindia1977@gmail.com

■ वर्षे २ रे ■ अंक २ ■ एप्रिल २०२५ ■ मुल्य : २५ रु ■ वार्षिक वर्गणी : २५० रु. ■ पान ४

# गरोदर महिलेकडे उपचारासाठी पैसे नसल्याने रुग्णालयाने दिला उपचारासाठी नकार

■ **पत्नीचा काही वेळाने झाला मृत्यू**

पुणे : भाजपचे विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे यांचे स्वीय सहायक सुशांत भिसे यांच्या पत्नी तनिशा भिसे यांना दीनानाथ मंगेशकर रुग्णालय प्रशासनाकडून उपचारासाठी पैशांची अडवणूक केल्याने तनिशा यांचा मृत्यू झाला असल्याचा आरोप कुटुंबियांकडून करण्यात आला आहे. कुटुंबियांनी दिलेल्या माहितीनुसार, तनिशा यांना प्रसूतीच्या वेदना होऊ लागल्याने दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात दाखल करण्यासाठी कुटुंबिय घेऊन गेले.त्यावेळी तेथील डॉक्टरांनी तनिशा यांची तपासणी केली आणि जुळ्या मुली आहेत.तसेच शस्त्रक्रिया गुंतागुंतीची असल्याचे कुटुंबियांना सांगण्यात आले.

या शस्त्रक्रियेकरीता २० लाख रुपयांचा खर्च येईल आणि सुरुवातीला किमान १० लाख रुपये तरी भरावे लागतील, असे कुटुंबियांना डॉक्टरांनी सांगितले. त्यावर आमच्याकडे सध्या २ते ३ लाख असून आम्ही इतर पैशांची जुळवाजुळव करू पण आपण उपचार करावे अशी विनंती केली. पण दीनानाथ मंगेशकर रुग्णालय प्रशासनाने उपचार करण्यास नकार दिला.

त्याच दरम्यान तनिशा यांची प्रकृती अधिकच खालवली.त्यानंतर सुशांत भिसे यांनी पत्नी ला दुसर्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.पण यामध्ये जवळपास तीन तासाचा कालावधी गेला आणि त्या रुग्णालयात तनिशा यांनी दोन जुळ्या मुलींना जन्म दिला.पण पुढील काही मिनिटामध्ये त्यांचा मृत्यू झाल्याची घटना घडली.तनिशा यांना दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील डॉक्टरांनी वेळेत उपचार दिले असते.तर आज तनिशा या मुलीसोबत आणि कुटुंबियासोबत राहिल्या असत्या, त्यामुळे तनिशा यांच्या मृत्यूला रुग्णालय प्रशासन जबाबदार असून त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे,अशी मागणी त्यांनी केली.

त्यावर दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचे जनसंपर्क अधिकारी रवी पालेकर म्हणाले,या घटनेसंदर्भात दीनानाथ रुग्णालयाकडून चौकशी केली जाणार आहे.या संदर्भातला अहवाल आम्ही राज्य सरकारला सादर करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालय प्रशासनाने गर्भवती असेलल्या तनिषा भिसे यांच्या उपचारांसाठी कुटुंबियांकडून दहा लाखांची मागणी केली. पैशांअभावी वेळेत उपचार न दिल्यामुळे तनिषा भिसे यांचा मृत्यू ओढवला, असा आरोप भिसे कुटुंबियांनी केला आहे. या घटनेनंतर पुण्यासह राज्यभरात संताप व्यक्त केला जात आहे. मंगेशकर रुग्णालय प्रशासनाने भिसे कुटुंबियांचे आरोप फेटाळले असून सदर प्रकाराची रुग्णालयाकडून चौकशी सुरू असल्याचे सांगितले. तनिषा भिसे यांचे पती सुशांत भिसे हे भाजपाचे विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे यांचे स्वीय सहायक आहेत. आमदारांनी स्वतः या प्रकरणात लक्ष घालून रुग्णालय प्रशासनाला विनंती करूनही रुग्णालयाने उपचार देण्यास नकार दिला, अशी माहिती समोर येत आहे.

सुशांत भिसे यांच्या भगिनी प्रियांका पाटील यांनी माध्यमांशी संवाद साधला. जुळ्या बाळांची तब्येत आता कशी आहे? याबद्दलही त्यांनी माहिती दिली. 'एका बाळाचे व्हेंटिलेटर काढले आहे. दोन्ही बाळांची प्रकृती आता स्थिर आहे', अशी माहिती त्यांनी दिली.

त्यांनी पुढे म्हटले की, त्यादिवशी आम्ही सकाळी ९ वाजता मंगेशकर रुग्णालयात गेलो. तिथे डॉक्टर घैसास यांनी प्राथमिक तपासणी केल्यानंतर बीपी वाढल्याचे सांगितले. तिथून त्यांनी नव्या इमारतीमध्ये तिसऱ्या मजल्यावर वहिनीला शिफ्ट करण्यास सांगितले. तिथे असेसमेंट रुममध्ये दुसरे डॉक्टर आले. त्यांनी परिस्थिती गंभीर असल्याची जाणीव करून दिली. सिझर करावे लागेल, त्यामुळे काही खाऊ-पिऊ नका, असे सांगितले. सिझरची तयारीही त्यांनी केली, रुग्णाचे कपडे घालायला दिले. त्यानंतर डॉक्टर घैसास आले, त्यांनी परिस्थिती गंभीर असल्याचे म्हटले. रक्तस्राव होत असल्यामुळे लगेचच शस्त्रक्रिया करावी लागेल, असे सांगितले.

प्रियांका पाटील म्हणाल्या, सातव्या महिन्यात प्रसूती होत असल्यामुळे बाळांना छखउण मध्ये ठेवावे लागेल, असे सांगितले. दोन्ही बाळांची प्रत्येकी दहा लाख असा वीस लाखांचा खर्च होईल, असेही ते म्हणाले. मात्र आम्ही विनंती केल्यानंतर त्यांनी दहा लाख आता भरण्यास सांगितले. पैसे भरणे शक्य नसल्यास तुम्ही ससूनला जाऊन उपचार घेऊ शकता, असेही म्हटले. हे सर्व आमची वहिणी तनिशा भिसे यांच्यासमोरच सांगितल्यामुळे वहिणीच्या मनावर दबाव आला. आधीच रक्तस्राव, उच्च रक्तदाब असल्यामुळे वहिनीची परिस्थिती नाजूक होती, त्याच खर्चाचा आकडा पाहून ती अशरक्षः कोसळली. वहिनी तिथेच रडायला लागली.

आम्ही पैशांची व्यवस्था करतो, अशी विनंती वारंवार करत होतो. रुग्णाच्या मनाला समाधान मिळेल यासाठी तरी उपचार सुरू करा, असेही म्हणालो. पण रुग्णालयाने रक्तस्राव थांबविण्याचा प्रयत्न केला नाही. आधीच्या रुग्णालयातून मिळालेली गोळीच खा, असे उत्तर दिले.

## टँकरच्या फेऱ्यांत वाढ, मार्च महिन्यात ४७ हजार ८९६ फेऱ्या

**पुणे** : शहरात वाढत्या उन्हाबरोबरच पाण्याची मागणी वाढली असून, टँकरच्या फेऱ्यांत वाढ झाली आहे. मार्च महिन्यात शहरात टँकरच्या ४७ हजार ८९६ फेऱ्या झाल्या आहेत. ही संख्या फेब्रुवारीमध्ये ३८ हजार ५२२ होती. एप्रिल आणि मे महिन्यात पालिका प्रशासनास शहराला पुरेसे पाणी देण्यासाठी चांगलीच कसरत करावी लागणार आहे.




मार्च महिन्यात उन्हाळ्याची तीव्रता वाढली आहे. काही दिवस तापमान ४० अंशांजवळ होते. वाढत्या उन्हाबरोबरच या महिन्यात जलवाहिन्या फुटणे, वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार घडले. यामुळे पाणीपुरवठा विस्कळीत झाला होता. परिणामी पाणी नसलेल्या भागात पाणीपुरवठा करण्यासाठी महापालिकेला टँकरचा आधार घ्यावा लागत आहे. शहरात जानेवारी २०२५ पासून प्रत्येक महिन्यात टँकरच्या मागणीत सरासरी ३ ते ४ हजारांची वाढ होत आहे. मात्र, मार्च महिन्यात ही संख्या १० हजारांनी वाढली आहे. डिसेंबर २०२४ मध्ये शहरात सुमारे ३६ हजार ५९१ टँकरच्या फेऱ्या झाल्या होत्या. हा आकडा जानेवारी २०२५ मध्ये ३९ हजार ६९२ पर्यंत गेला होता.

फेब्रुवारी महिन्यात पुन्हा हा आकडा ३८ हजार ५२२ फेऱ्यांपर्यंत आला. मात्र, मार्च महिन्यात यात मोठी वाढ झाल्याचे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले. पुढील दोन महिन्यांत यामध्ये अधिकच वाढ होण्याची शक्यता आहे.

शहरात गेल्या वर्षभरात टँकरच्या ४ लाख ८८ हजार फेऱ्या झाल्या आहेत. हा आकडा गेल्या तीन वर्षांच्या तुलनेत सर्वाधिक आहे. २०२२-२३ मध्ये टँकरच्या फेऱ्या ३ लाख ५४ हजार झाल्या होत्या, २०२३-२४ मध्ये ४ लाख ३४८ फेऱ्या झाल्या होत्या. मात्र, यंदाच्या वर्षी टँकरच्या फेऱ्यांची संख्या तब्बल ८८ हजारांनी वाढली असल्याचे समोर आले आहे.

## शरीराचे पाच तुकडे करून खून

**पिंपरी** : भोसरी येथून चार दिवसांपासून बेपत्ता असलेल्या जेसीबीचालकाचा खून करून त्याच्या शरीराचे पाच तुकडे केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. आरोपींनी मृतदेहाचे पाच तुकडे करून ठिकठिकाणी फेकून दिले. त्याचे धड मोशी येथील खाणीत आढळून आल्याने खुनाचा उलगडा झाला. सिद्धाराम प्रभू ढाले (वय ४५, रा. गव्हाणे वस्ती, भोसरी) असे खून झालेल्या जेसीबीचालकाचे नाव आहे. सिद्धाराम यांच्या पत्नीने दिघी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. सिद्धाराम हे जेसीबीवर चालक म्हणून काम करीत असत. २९ मार्च रोजी सिद्धाराम सकाळी घरातून कामासाठी बाहेर पडले. ते परत आले नाहीत. कुटुंबीयांनी त्यांचा सर्वत्र शोध घेतला. मात्र, ते सापडत नसल्याने ३१ मार्च रोजी भोसरी पोलीस ठाण्यात सिद्धाराम यांची बेपत्ता झाल्याची तक्रार त्यांच्या पत्नीने दिली.

## ट्रॅक्टर विहिरीत कोसळून ७ महिला मजूर ठार

नांदेड : तालुक्यातील आलेगाव येथे मजुराला घेऊन शेताकडे जात असलेले ट्रॅक्टर वाहनचालकाचा ताबा सुटल्याने एका विहिरीमध्ये कोसळले. यात ७ महिलांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला तर तिघेजण गंभीर जखमी झाले आहेत. सदर घटना शुक्रवार दि. ४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजताच्या सुमारास घडली. सर्व मयत व जखमी गुंजगाव ता. वसमत जि. हिंगोली येथील मजूरदार आहेत.

नांदेड तालुक्यातील आलेगाव येथे हळद काढणीसाठी गुंजगाव ता. वसमत जि. हिंगोली येथील १० मजूर एका ट्रॅक्टरमध्ये बसून आले होते. आलेगाव येथील शेतामध्ये जात असताना रस्त्यात असलेल्या एका विहिरीमध्ये वाहन चालकाचा ताबा सुटल्याने सदर ट्रॅक्टर कोसळले. यात ७ महिलांचा मृत्यू झाला असून त्यात २ अल्पवयीन मुलींचा समावेश आहे. जखमीमध्ये २ महिला सह १ पुरुष जखमी झाला असून दुर्घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार जिल्हाधिकारी कर्डिले यांनी घटनास्थळी भेट दिली.

सकाळी १० वाजल्यापासून मृतदेह शोधण्यासाठी आपत्कालीन व्यवस्थापन घटना स्थळी दाखल झाले होते. दुपारी २ वाजेपर्यंत जवळपास ७ जणांचे मृतदेह विहिरी बाहेर काढण्यात आले. मृतामध्ये ताराबाई सटवाजी जाधव वय ३५, धुरपता सटवाजी जाधव वय १८, सरस्वती लखन मुरड वय २५, चतुराबाई माधव पारदे वय ४५, सपना उर्फ मीना राजू राऊत वय २५, ज्योती इरबाजी सरोदे वय ३० या ७ महिलांचा मृतांमध्ये समावेश आहे. तर जखमी पार्वतीबाई रामा बुरडे ३५, पुरभाबाई संतोष कांबळे वय ४०, सटवाजी जाधव वय ५५ सर्व रा. गुंजगाव ता. वसमत जि. हिंगोली येथील रहिवासी आहेत.

## महापालिकेचा कत्तलखाना बंद करण्याचा इशारा

■ **नियमांचे पालन होत नसल्याने प्रदूषण मंडळाकडून खडे बोल**

**पुणे** : महापालिकेच्या कोंढवा येथील कत्तलखान्यात नियमांचे पालन होत नसल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (एमपीसीबी) महापालिकेला कत्तलखाना बंद करण्याचा इशारा दिला. पंधरा दिवसांत आवश्यक त्या उपाययोजना करण्याची ग्वाही महापालिकेकडून देण्यात आल्याने कत्तलखान्यावरील कारवाई तूर्तास टळली आहे.

कोंढवा येथे महापालिकेच्या कत्तलखान्यात मोठ्या आकाराच्या जनावरांची कत्तल केली जाते. या ठिकाणी नियमांचे पालन केले जात नसल्याचे महाराष्ट्र प्रदूषण मंडळाच्या निदर्शनास आले होते. त्यामुळे महापालिका प्रशासनाला खडे बोल सुनावत कत्तलखाना बंद करण्याचा इशारा देण्यात आला. त्यावर महापालिकेने पुढील १५ दिवसांत आवश्यक ती काळजी घेण्याचे आश्वासन दिले आहे. हा कत्तलखाना असलेल्या परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरलेली असते. दररोज सुमारे १५० जनावरांची कत्तल केली जाते. प्राण्यांचे अवयव, तसेच त्यांचे रक्त सांडपाणीवाहिनीत सोडण्यात येते. काही दिवसांपूर्वी येथील सांडपाणीवाहिनी बंद झाल्याने मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरली होती. या ठिकाणी सांडपाण्याची तपासणी होत नाही. तसेच, मांसाची तपासणी केली जात नाही, अशा तक्रारी आल्या होत्या.

यावरून प्रदूषण नियंत्रण मंडळाने महापालिकेला धारेवर धरल्याने आरोग्य विभागाची धावपळ सुरू झाली आहे. याबाबतचा खुलासा प्रदूषण नियंत्रण मंडळाला करण्यात आला असून, १५ दिवसांत उपाययोजना करू, असे आश्वासन दिले आहे.'कत्तलखान्याच्या परिसरात साचलेले सांडपाणी गोळा करण्यात येत आहे. या ठिकाणी दररोज साफसफाई केली जात आहे. कत्तलखान्याच्या परिसरात औषधांची फवारणी करण्यात येत आहे. कत्तलखान्याच्या ठिकाणी कचरा साचणार नाही, याची काळजी घेतली जाईल. मासिक अहवाल प्रयोगशाळेकडून घेण्यात येत आहे,' असा खुलासा आरोग्य विभागाने केला आहे.

# संपादकीय

## दोस्तीत कुस्ती...

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'अमेरिका फर्स्ट' धोरणांतर्गत इतर देशांसोबत 'जशास तसे' कर धोरण राबवण्याचा निर्णय घेतला असून रेसिप्रोकल टॅक्स आकारण्याची घोषणा केली. बुधवारी त्यांनी यासंबंधीच्या अध्यादेशावर स्वाक्षरी केली. त्यानुसार भारतीय मालावर २७ टक्के आयात शुल्क लागू करण्यात आले आहे. चीनवर ३४ टक्के, व्हिएतनामवर ४६ टक्के, युरोपीय महासंघावर २० टक्के, बांगला देशवर ३७ टक्के तर थायलंडवर ३६ टक्के आयात शुल्क लागू करण्यात आले आहे. ट्रम्प यांनी जगभरातून आयात होणा-या वस्तूंवर कर लादण्याचा आणि प्रमुख व्यापारी भागीदारांवर अतिरिक्त कठोर शुल्क लादण्याचा निर्णय घेतला आहे. चीनच्या वाणिज्य मंत्रालयाने एका निवेदनाद्वारे हे शुल्क त्वरित रद्द करण्याचे आवाहन केले आहे. कारण यामुळे जागतिक आर्थिक विकासाला धोका निर्माण होईल, अमेरिकेचे हित आणि आंतरराष्ट्रीय पुरवठा साखळीला हानी पोहोचेल असा इशारा दिला आहे. अमेरिकी वस्तूंवर भारत मोठ्या प्रमाणात आयात शुल्क लावत असल्याचा आरोप ट्रम्प प्रशासनाने वारंवार केला होता. भारत अमेरिकन मालावर ७० टक्के कर आकारत असल्याचा आरोप केला.

ट्रम्प पत्रकार परिषदेत म्हणाले, 'अमेरिका फर्स्ट' अभियानासाठी कर लावणे गरजेचे होते. 'जशास तसे' कर लावल्याने अमेरिकन तिजोरीत दरवर्षी ४३ लाख कोटी रुपयांची भर पडेल. अमेरिकेत येणा-या जवळपास सर्व वस्तूंवर किमान १० टक्के कर लादला जाईल. व्यापार तूट कमी करण्यासाठी भारतीय उत्पादनांच्या आयातीवर २६ टक्के कर लावण्यात आला आहे. भारताकडून आकारण्यात येणा-या आयात शुल्काच्या तुलनेत हा कर निम्मा आहे. भारतासह सुमारे २५ देशांवर अशाच प्रकारे आयात शुल्क लावण्यात आले आहे. आयात शुल्काची घोषणा करताना ट्रम्प म्हणाले, आमच्यासाठी हा मुक्तिदिन आहे. दीर्घकाळापासून या दिवसाची प्रतीक्षा होती. अमेरिकन उद्योगाचा पुनर्जन्म, अमेरिकेच्या भाग्योदयाचा दिवस म्हणून २ एप्रिल २०२५ ही तारीख लक्षात ठेवली जाईल. या दिवशी आम्ही अमेरिकेला पुन्हा समृद्ध करण्याचे काम सुरू केले. डोनाल्ड ट्रम्प यांनी कर आकारणीवरून जगाला दिलेला इशारा अखेर अमलात आणला आहे. जगातील जवळपास १०० देशांवर ट्रम्प यांनी 'जशास तसा' (टॅरिफ) कर लावला आहे.

या 'कर'भाराविरोधात जगभरातून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. १० टक्के टॅरिफची अंमलबजावणी ५ एप्रिलपासून तर 'जशास तसा' कराची अंमलबजावणी ९ एप्रिल रोजी सुरू होईल. ट्रम्प प्रशासनाने जगातील अनेक देशांवर लावलेल्या करांमुळे अमेरिकन अर्थव्यवस्थेचे मोठे नुकसान होईल असे अर्थतज्ज्ञ रघुराम राजन यांनी म्हटले आहे. अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेला याचा प्रथम फटका बसेल. एखादा फुटबॉलपटू स्वत:च्याच गोलपोस्टमध्ये फटका मारून सेल्फ गोल करतो, तसेच काम अमेरिकेने केले आहे. अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेचेच मोठे नुकसान होईल, भारतावर त्याचा किरकोळ परिणाम होईल. भारतातून निर्यात केल्या जाणा-या वस्तूंवर कर वाढल्याने अमेरिकन ग्राहकांना वस्तू महाग मिळतील. त्यामुळे मागणी कमी होईल. टॅरिफ म्हणजे एखाद्या देशातून आयात करणा-या वस्तूंवर लावलेले शुल्क. भारतातून अमेरिकेत जाणा-या वस्तूंवर २६ टक्के टॅरिफ लावले जाईल. याचा भारताच्या वेगवेगळ्या क्षेत्रांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. सर्वाधिक प्रभाव कृषी क्षेत्रावर पडू शकेल. भारताने कृषी क्षेत्रात क्रांती केली आहे. भारताची अर्धी लोकसंख्या कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. कृषी क्षेत्रात भारत जगातील आठव्या क्रमांकाचा निर्यातदार देश आहे. तसेच सर्वांत मोठा दूध उत्पादक देशही आहे. भारत जगभरात धान्य, फळे, दुग्धजन्य पदार्थ निर्यात करतो.

भारत अमेरिकेला तांदूळ, कोळंबी, मध, एरंडेल तेल, काजू, फळे, भाजीपाला, डेअरी उत्पादने, चहा-कॉफी, कोको पावडर, मसाल्याचे पदार्थ निर्यात करतो तर अमेरिकेतून बदाम, अक्रोड, पिस्ता, सफरचंद आणि कडधान्य भारतात येते. अमेरिकेचा डोळा भारतातल्या कृषि बाजारपेठेवर आहे. याआधीही अमेरिकेने भारताची कृषि बाजारपेठ खुली करण्याची मागणी केली होती. अमेरिकेने लादलेल्या टॅरिफमुळे भारतीय कृषी क्षेत्रावर परिणाम होण्याची शक्यता आहे. भारतातील अमेरिकन कृषी उत्पादनावर सरासरी ३७.७ टक्के टॅरिफ लावण्यात आला आहे. अमेरिकेत भारतीय कृषी उत्पादनावर हा कर ५.३ टक्के होता. आता अमेरिकेने त्यात वाढ केली आहे. जागतिक व्यापार संघटनेच्या नियमानुसार भारत विकसनशील देश असल्याने भारताला अधिक कर लादता येतो. पण आता ट्रम्प यांनी 'मेक इन अमेरिका ग्रेट अगेन' ही मोहीम हाती घेतली आहे. भारतातून अमेरिकेत निर्यात जास्त होते तर आयात कमी होते. भारतीय शेतमालावर २६ टक्के टॅरिफ लावल्याने भारतीय वस्तू अमेरिकन बाजारपेठेत प्रचंड महाग होतील आणि त्याचा फायदा तेथील स्थानिक उत्पादकांना होईल. ट्रम्प सरकारला मोठा महसूल मिळेल आणि भारतीयांचे नुकसान होईल. ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणामुळे आणि दबावामुळे भारतीय कृषि बाजारपेठ खुली झाली आणि विदेशी उत्पादनावरील आयात कमी झाली तर भारतीय शेतक-यांचा टिकाव लागणार नाही.

इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिओ मेलोनी यांनी अमेरिकन टॅरिफ अयोग्य असल्याचे म्हटले आहे. यामुळे व्यापारयुद्ध भडकू शकते असे त्या म्हणाल्या. ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानिज यांनी टॅरिफ व्यवहार्य नाही, ते पूर्णपणे चुकीचे आहे असे म्हटले आहे. टॅरिफला कसलाही तर्काधार नाही. अमेरिका आणि ऑस्ट्रेलियाच्या मैत्रीविरोधातले हे पाऊल आहे. एखादा मित्र असे वागू शकत नाही असेही ते म्हणाले. डोनाल्ड ट्रम्प भारताचा उल्लेख करताना म्हणाले, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी काही दिवसांपूर्वीच इथे येऊन गेले. ते माझे फार चांगले मित्र आहेत. मी त्यांना म्हटलं की, तुम्ही माझे मित्र असलात तरी माझ्या देशावर अन्याय करत आहात. त्यांनी आपल्यावर ५२ टक्के कर लावला आहे. त्या तुलनेत गेली कित्येक वर्षे आपण त्यांच्याकडून काहीच कर घेतलेला नाही. ट्रम्प यांच्या वक्तव्यावरून त्यांचे खायचे आणि दाखवायचे दात वेगळे आहेत हेच दिसून येते. ट्रम्प यांना मोदी काय आणि कसे उत्तर देतील ते बघावे लागेल. तूर्त मोदी म्हणत असतील, दोस्त दोस्त ना रहा!

## 'वक्फ दुरुस्ती विधेयक' मंजूर

वादग्रस्त 'वक्फ सुधारणा विधेयक-२०२५' वादळी चर्चेनंतर लोकसभेत मंजूर झाले. केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी बुधवारी प्रचंड गोंधळात लोकसभेत वादग्रस्त 'वक्फ सुधारणा विधेयक-२०२५' सादर केले. या विधेयकावर लोकसभेत सत्ताधारी व विरोधकांकडून वादळी चर्चा झाली. हे विधेयक घटनाबा असून मुस्लिमांना लक्ष्य करणारे असल्याचा आरोप विरोधी पक्षाच्या सदस्यांनी केला. मात्र, सरकारची मुस्लिमांच्या धार्मिक बाबींमध्ये हस्तक्षेप करण्याची कोणतीही इच्छा नाही, वक्फ मालमत्तांचे प्रशासन पारदर्शक असावे हाच केवळ त्यामागील उद्देश आहे, असे स्पष्ट करून केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या विधेयकाचे सरकारच्या वतीने जोरदार समर्थन केले.

वक्फ विधेयकाचे 'युनिफाईड वक्फ मॅनेजमेंट एम्पॉवरमेंट, एफिशियन्सी अँड डेव्हलपमेंट' (उम्मीद) विधेयक असे नामकरण करण्यात आल्याचे रिजिजू यांनी सांगितले. सुमारे १२ तासांहून अधिक काळ चाललेल्या वादळी चर्चे नंतर विधेयक मंजूर करण्यात आले. गरीब मुस्लिमांच्या कल्याणासाठी हा कायदा करण्यात येत असल्याचा दावा सरकारने केला. तसेच मुस्लिम समुदायाच्या धार्मिक परंपरेत कोणत्याही हस्तक्षेपाशिवाय केवळ वक्फ मालमत्तांचे संरक्षण, सुयोग्य व्यवस्थापन करण्याच्या उद्देशाने हा कायदा करण्यात येत असल्याचे सरकारने स्पष्ट केले. तर विरोधकांनी प्रस्तावित कायदा घटनाबा , संसदेच्या अधिकार क्षेत्राबाहेरील असल्याचा दावा केला. तसेच या कायद्याच्या आडून मुस्लिमांची जमीन हडपण्याचा सरकारचा कट असल्याचा आरोप करत या विधेयकाला कडाडून विरोध केला. भाजपचा महत्त्वाचा घटक पक्ष जेडीयूने वक्फ विधेयकाला पूर्ण पाठिंबा दिला आणि पंतप्रधान मोदी हे मुस्लिमविरोधी असल्याचा विरोधक अपप्रचार करीत आहेत असा आरोप केला.

विधेयकातील प्रस्तावित सुधारणा या पासमंदांच्या (मागास मुस्लिम) आणि अल्पसंख्याक धर्मातील गरीब आणि महिलांच्या हिताच्या आहेत असा दावा केंद्रीय मंत्री ललन सिंह यांनी केला. मोदी सरकारच्या राजवटीत पासमंदांना न्याय मिळाल्याने ते आगामी काळात मोदींच्या पाठीशी उभे राहतील असेही ते म्हणाले. तेलुगू देसमने विधेयकात एक महत्त्वाची सुधारणा सुचवली असून त्या अटीवर विधेयकाला पाठिंबा दिला आहे. राज्यांमधील वक्फ बोर्डामध्ये बिगर मुस्लिम सदस्याच्या समावेशाबाबत निर्णय घेणे त्या त्या राज्यावर सोपवले जावे, अशी ही मागणी आहे. वक्फ बोर्डावर महिलांची नियुक्ती करण्याची तरतूद विकासाभिमुख असल्याचे पक्षाने म्हटले आहे. सरकारचा कोणत्याही धार्मिक संस्थेत हस्तक्षेप करण्याचा हेतू नाही. यूपीए सरकारने वक्फ कायद्यामध्ये बदल केल्याने अन्य कायद्यांवर परिणाम होत असल्याने नव्या सुधारणा गरजेच्या होत्या असे रिजिजू यांनी विरोधी पक्ष सदस्यांच्या गोंधळातच स्पष्ट केले. जे घटक वक्फ विधेयकाचा भागच नाहीत त्यावरून विरोधी सदस्य जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहेत असेही रिजिजू म्हणाले. गतवर्षी सप्टेंबरमध्ये सरकारने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार वक्फ बोर्डाकडे सध्या ९.४ लाख एकर क्षेत्रफळ आहे.

त्यापैकी ८.७ लाख एकर मालमत्तेवर वक्फ बोर्डाचे थेट नियंत्रण आहे. या मालमत्तेची किंमत सुमारे १.२ लाख कोटी आहे. जगात सर्वाधिक वक्फ मालमत्ता भारतात आहे. भारतीय लष्कर आणि रेल्वेनंतर वक्फ बोर्डाकडे सर्वाधिक जमीन आहे. ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाने या विधेयकाला विरोध केला आहे. हे विधेयक मुस्लिम समाजाचे अधिकार कमकुवत करणारे असून ते सरकारने तातडीने मागे घ्यावे, असे बोर्डाचे सरचिटणीस मोहम्मद फजलुर्रहीम यांनी म्हटले आहे. ते म्हणाले, या विधेकात दुरुस्ती झाल्यानंतर वक्फ संपत्तीचे व्यवस्थापन मुस्लिमांकडे राहणार नाही. ते सरकारच्या नियंत्रणात जाईल. देशात मालमत्ता नियंत्रणाच्या बाबतीत रेल्वे आणि संरक्षण विभागानंतर वक्फचा तिसरा क्रमांक आहे. रेल्वे आणि संरक्षण मालमत्ता या देशाच्या आहेत. मात्र वक्फ मालमत्ता खासगी स्वरूपाच्या आहेत. सर्वसामान्य मुस्लिमांची ७० वर्षे व्होट बँकेसाठी दिशाभूल करण्यात आली. सर्वसामान्य, गरीब आणि तळागाळातील मुस्लिमांच्या कल्याणासाठी वक्फ मालमत्तांचा वापर का करण्यात आला नाही असा सवालही सरकारने केला. विधेयकाच्या बाजूने २८८ तर विरोधात २३२ सदस्यांनी मतदान केले.

इंडिया आघाडीतील पक्षांनी हे विधेयक म्हणजे घटनेच्या मूळ ढाच्यावर आघात आहे असा हल्ला चढवला तर 'उम्मीद' असे विधेयकाचे बारसे करत भाजपने आपला अजेंडा रेटला. दरम्यान मुस्लिम पर्सनला लॉ बोर्डाने या विधेयकाला कोर्टात आव्हान देणार असल्याचे म्हटले असून देशव्यापी आंदोलनाची हाक दिली आहे. वक्फ बोर्डावर आता शिया, सुन्नी, बोहरा, मागासवर्गीय मुस्लिम महिला, तज्ज्ञ गैरमुस्लिम देखील असतील. त्याचबरोबर यामध्ये चारपेक्षा जास्त गैरमुस्लिम देखील असू शकतात. तसेच वक्फ बोर्डावर दोन महिला सदस्य अनिवार्य आहेत. आतापर्यंत वेगवेगळ्या समुदायांमधील २८४ शिष्टमंडळांनी संयुक्त संसदीय समितीसमोर त्यांची मतं मांडली आहेत आणि त्यांनी सूचना केल्या आहेत. २५ राज्य सरकारे आणि केंद्रशासित प्रदेशांच्या वक्फ बोर्डानेही त्यांची मते मांडली आहेत. हे विधेयक मांडले नसते तर ज्या इमारतीत आपण आता बसलो आहोत ती संसद भवनाची वास्तूही वक्फची मालमत्ता असल्याचा दावा केला गेला असता. वक्फचा 'खौफ' संपविण्यासाठीच हे पाऊल टाकल्याचे रिजिजू यांनी म्हटले. वक्फ बोर्डात २ महिला आणि २ गैरमुस्लिम सदस्यांची नियुक्ती होणार आहे.

वक्फ ट्रिब्युनलशिवाय मालमत्ता मालक उच्च न्यायालयापर्यंत अपील करू शकतात. ट्रिब्युनलच्या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान देता येऊ शकेल. कोणी वक्फला जमीन दान करत नाही तोपर्यंत ती वक्फची मालमत्ता होणार नाही. त्या मालमत्तेवर मशीद असली तरी जिल्हाधिकारी वक्फच्या मालमत्तांचे सर्वेक्षण करतील अशा प्रकारच्या सुधारणा विधेयकात करण्यात आल्या आहेत. या विधेयकाचा उद्देश मुस्लिमांना अपमानित करणे आहे म्हणून हे बिल फाडतो अशी आक्रमक भूमिका घेत एमआयएमचे असदुद्दीन ओवेसी यांनी बिल फाडले. हे विधेयक वक्फ मालमत्तेशी संबंधित वाद सोडवण्यास आणि त्याचा प्रभावी वापर सुनिश्चित करण्यास मदत करेल तसेच ते मुस्लिम महिलांचे हक्क देखील सक्षम करेल अशी सरकारला आशा आहे. वक्फवर दोन गैरमुस्लिम मग हिंदू मंदिरावर, रामलल्लावर का नाही असा ओवेसी यांचा सवाल आहे.

## लाही लाही होणार!

भारतीय हवामान विभागाने येत्या काही महिन्यांत देशभरात सामान्यपेक्षा जास्त तापमान राहील, असा अंदाज व्यक्त करत उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. त्यामुळे यंदाचा उन्हाळा अधिक तापदायक असेल असे आयएमडी (भारतीय हवामान विभाग) ने म्हटले आहे. एप्रिल ते जून दरम्यान देशात सहा ते दहा दिवस उष्णतेची लाट पहावयास मिळू शकते. राज्यात एप्रिल ते जून दरम्यान तापमान नेहमीपेक्षा अधिक राहण्याचा अंदाज आहे. मध्य आणि पूर्व भारत तसेच वायव्य भागात उष्णतेची लाट अधिक दिवस राहील. देशात बहुतांश भागात किमान तापमानही अधिक असेल. देशात साधारणपणे एप्रिल ते जून या कालावधीत चार ते सात दिवस उष्णतेची लाट असते.

परंतु याच कालावधीत उत्तर आणि पूर्व भारत, मध्य भारत आणि वायव्य भारतातील बहुतांश भागात सामान्यपेक्षा दोन ते चार दिवस जास्त उष्णतेच्या लाटेचा अनुभव येण्याची शक्यता आहे. राजस्थान, गुजरात, हरियाणा, पंजाब, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, ओडिशा, छत्तीसगड, तेलंगणा, आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि तामिळनाडूच्या उत्तरेकडील भागांमध्ये उष्णतेच्या लाटेचे दिवस सामान्यपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. आयएमडीच्या अंदाजानुसार एप्रिलमध्ये एक ते तीन उष्णतेच्या लाटेचे दिवस असतात. परंतु यंदा ते तीन ते सहा दिवसांपर्यंत वाढू शकतात. सकारात्मक बाब म्हणजे मान्सून हंगामावर एल निनोचा परिणाम होण्याची शक्यता नाही. यंदाच्या उन्हाळ्यात उष्णतेच्या लाटेचे दिवस अधिक असण्याची शक्यता असल्याने देशात वीज मागणीत ९ ते १० टक्के वाढ होण्याची शक्यता आहे. गतवर्षी ३० मे रोजी देशात सर्वाधिक वीज मागणी २५० गिगावॅट्स होती. हवामान बदलामुळे सतत वाढत जाणारी उष्णता हे विजेच्या वाढत्या मागणीचे मुख्य कारण आहे.

यंदा गतवर्षीच्या तुलनेत अधिक वीज मागणी होण्याची शक्यता आहे. मार्च महिनाअखेर उन्हाच्या तीव्रतेने आपले रूप दाखवण्यास सुरुवात केली आहे. ३० मार्चला तापमान ४० अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले होते. सध्या सकाळपासूनच तीव्र उन्हामुळे लोक घरातच राहणे पसंत करत आहेत. रात्री किंचित गारवा जाणवत असला तरी दिवसा उन्हाच्या कडाक्याने लोकांचे हाल सुरू आहेत. बदलत्या हवामानाचा परिणाम लोकांच्या आरोग्यावर होत आहे. अत्याधिक उष्णतेमुळे सर्दी, खोकला आणि ताप यासारख्या समस्या वेगाने पसरत आहेत. उष्णतेपासून बचाव करण्यासाठी बाहेर पडताना छत्री, टोपी, गमछा वापरा, हलक्या रंगाचे सुती कपडे परिधान करा, कॅफिन आणि अल्कोहलचे सेवन टाळा असे आवाहन तज्ज्ञांनी केले आहे.ठाणे जिल्ह्यासह कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर भागात १० मार्चच्या सुमारास उष्णतेची मोठी लाट आली होती. ही लाट तीन ते चार दिवस सलग राहिल्याने या काळात पारा ४२ अंश सेल्सिअसपर्यंत गेला होता. होळीनंतर ही उष्णतेची लाट ओसरली होती.

आता पुन्हा उष्णता वाढण्यास सुरुवात झाली आहे. हवामानाच्या शास्त्रीय विश्लेषणानुसार मार्च महिन्यात भारतीय उपखंडात प्रतिचक्रवाती प्रणाली तयार होते. ही अत्यंत सामान्य गोष्ट आहे. या प्रणालीमुळे उत्तर-ईशान्येकडून कोरडे, उष्ण वारे वाहू लागतात. या वा-यांना रोखू शकणारे थंड वारे या काळात नसतात. त्यामुळे तापमान सरासरीपेक्षा चार ते पाच अंशांनी वाढते. एप्रिल महिन्यात किमान दोन ते तीन उष्णतेच्या लाटा येऊ शकतात. त्यांची संख्या कमी-जास्त होऊ शकते. या महिनाअखेरपर्यंत तरी पावसाची कोणतीही शक्यता अजून तरी दिसत नाही. असे असले तरी एप्रिल महिन्याची सुरुवात वळीव पावसाने होईल, राज्यात विजांच्या कडकडाटासह वळीव पाऊस होण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. हिमालय ते उत्तर भारतात पश्चिमी चक्रवात सक्रिय झाला आहे. तामिळनाडू राज्यातही कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने देशातील बहुतांश भागात वळवाचा पाऊस होईल असा अंदाज आहे. एप्रिलमध्ये देशभरात ३९ टक्के पाऊस पडेल असा अंदाज आहे. हवामान विभागाने महाराष्ट्रात जोरदार पावसाचा इशारा दिला आहे. वादळी वा-यासह जोरदार पाऊस आणि गारपिटीचा इशारा देण्यात आला आहे.

बंगालच्या उपसागरावरून येणारे बाष्पयुक्त वारे आणि ओडिशापासून तामिळनाडूपर्यंत हवेची द्रोणीय स्थिती निर्माण झाल्याने पुढील पाच दिवस राज्यात ढगाळ वातावरण असणार आहे. त्यामुळे वादळी वारे, ढगांच्या गडगडाटासह अवकाळी पावसाचा अंदाज आहे. या काळात राज्यात कमाल तापमान ३५ ते ४२ अंश सेल्सिअसदरम्यान राहील. बाष्पयुक्त वातावरण आणि तापमानवाढीमुळे जास्त उंचीचे ढग निर्माण होत आहेत. त्यामुळे पुढील पाच दिवस अवकाळी पावसाचे वातावरण राहील. जागतिक हवामान संघटनेच्या अहवालानुसार २०२४ हे वर्ष आतापर्यंत नोंदवलेले सर्वांत उष्ण वर्ष ठरले आहे. या वर्षी पृथ्वीच्या पृष्ठभागाचे तापमान १.५५ अंश सेल्सिअसने जास्त होते. ही वाढ हरितगृह वायूच्या प्रमाणात झालेली झपाट्याने वाढ आणि ला निना व एल निनोमध्ये झालेल्या बदलामुळे झाली. वाढत्या उष्णतेमुळे दुष्काळ, वादळ, पूर यासारख्या हवामान आपत्तीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. वातावरणात कार्बन डाय ऑक्साईड, मिथेन आणि नायट्रस ऑक्साईड या हरितगृह वायूंच्या प्रमाणात विक्रमी वाढ झाली. या वायूंमुळे वातावरणातील उष्णता दीर्घकाळ टिकून राहते. जागतिक तापमानवाढीचे हे एक प्रमुख कारण आहे.

वाढत्या हवामान बदलामुळे भविष्यात उष्णतेची तीव्रता आणखी वाढण्याची शक्यता आहे. या संकटाला आळा घालायचा असेल तर हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी करणे आणि पर्यावरणपूरक धोरण अवलंबणे अत्यावश्यक आहे. राज्यात उष्णतेच्या लाटेमुळे शेतकरी, बांधकाम कामगार, बाहेर इतर काम करणा-या व्यक्तींना विशेष धोका आहे. उच्च तापमानामुळे उष्माघात, निर्जलीकरण आणि इतर आरोग्य समस्यांचे प्रमाण वाढू शकते. त्यामुळे स्थानिक प्रशासनाने नागरिकांना सावध राहण्याचे आणि आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. महाराष्ट्रातील मोठ्या शहरांतील लोकसंख्येची घनता, फसलेले शहर नियोजन, नाहीसा होत असलेला हरित पट्टा आणि हवेतील आर्द्रतेमुळे या वाढत्या तापमानाचा परिणाम नागरिकांना सहन करावा लागत आहे. एकंदरीत यंदाच्या उन्हाळ्यात अंगाची लाही लाही होणार असे दिसते.

**printed by SHIVAJI BABAN KHEDKAR, and published by SHIVAJI BABAN KHEDKAR, Owner by SHIVAJI BABAN KHEDKAR on behalf of Marathi Magazine SWARAJ DUNIYA, printed at M/s. Shree Samarth Printers, Appa Balwant Chowk, Near Prabhat Theatre, 535, Shanivar Peth, Pune - 411030 (Maharashtra) and published at Property No. 2585, Gat No. 1026, Old Bhambarde Road, Ranjangaon Ganpati, Tal. Shirur, Dist. Pune - 412209 (Maharashtra) Editor - SHIVAJI BABAN KHEDKAR**

**मुद्रक शिवाजी बबन खेडकर आणि प्रकाशक शिवाजी बबन खेडकर मालक शिवाजी बबन खेडकर यांचे नावे मराठी मासिक स्वराज दुनिया, श्री समर्थ प्रिंटर्स, अप्पा बळवंत चौक, प्रभात थेअटरच्या जवळ, ५३५, शनिवार पेठ, पुणे – ४११०३० (महाराष्ट्र). द्वारे मुद्रित करुन आणि प्रकाशन ठिकाण : प्रॉपर्टी नं. २५८५, गट नं. १०२६, जुना भांबर्डे रोड, रांजणगाव गणपती, ता. शिरूर, जि. पुणे – ४१२२०९ (महाराष्ट्र). संपादक : शिवाजी बबन खेडकर**

# पुणे महापालिकेचा तक्रार निवारण कक्ष कार्यान्वित

पहिल्याच दिवशी ४५ तक्रारी अतिरिक्त आयुक्तांनी ऐकल्या

**पुणे :** पुणे महापालिकेत नागरिकांची गाऱ्हाणी ऐकण्यासाठी सुरू करण्यात आलेला तक्रार निवारण कक्ष गुरुवारी सुरू झाला. पहिल्याच दिवशी या कक्षाच्या माध्यमातून ४५ तक्रारी आल्या. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त एम. जे. प्रदीप चंद्रन यांनी नागरिकांच्या तक्रारी ऐकून घेतल्या. अतिक्रमण, रस्ते, तसेच कचरा अशा तक्रारींचा प्रामुख्याने यामध्ये समावेश होता.

दैनंदिन जीवनाशी संबंधित विविध तक्रारी घेऊन अनेक नागरिक महापालिका भवनामध्ये येत असतात. विभागप्रमुख दाद देत नसल्याने अनेक नागरिकांना थेट महापालिका आयुक्तांना भेटायचे असते. सोमवार आणि गुरुवार या आयुक्तांच्या भेटीच्या दिवशी महापालिका आयुक्तांच्या कार्यालयाबाहेर मोठी गर्दी असते. त्यामुळे काहींना आयुक्तांच्या भेटीविनाच परतावे लागते. आयुक्तांची भेट न झाल्याने आपली समस्या ऐकून घेतली जात नसल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण होते. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांच्या सूचनेनुसार हा कक्ष सुरू करण्यात आला आहे.

यामध्ये महापालिकेतील दोन्ही अतिरिक्त आयुक्त सोमवारी आणि गुरुवारी नागरिकांच्या तक्रारी ऐकून घेणार आहेत. या तक्रारींवर आवश्यक तो अभिप्राय लिहून अतिरिक्त आयुक्त



संबंधित विभागाकडे पाठविणार आहेत. गुरुवारी या कक्षाची सुरुवात झाली. पहिल्याच दिवशी ४५ तक्रारी ऐकून घेण्यात आल्या. अतिरिक्त आयुक्त एम. जे. प्रदीप चंद्रन यांनी या तक्रारी ऐकून आवश्यक त्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. यामध्ये सर्वाधिक तक्रारी या अनधिकृत बांधकामांविषयीच्या होत्या. याशिवाय, रस्त्यांची दुरवस्था, खड्डे, घनकचरा व्यवस्थापन आणि पाणीपुरवठ्याशी संबंधित असल्याचे चंद्रन यांनी सांगितले.

प्रेक्षक कक्षाचे रूपांतर तक्रार निवारण कक्षात

महापालिका भवनामधील जुन्या इमारतीमध्ये असलेल्या सर्वसाधारण सभेच्या सभागृहातील (जीबी हॉल) प्रेक्षक कक्षाचे रूपांतर तक्रार निवारण कक्षात करण्यात आले आहे. येथे १८० नागरिकांची बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. दर सोमवारी आणि गुरुवारी दुपारी अतिरिक्त आयुक्त या कक्षात बसून नागरिकांच्या तक्रारी ऐकून घेणार आहेत. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना देतील. त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळेल, असा विश्वास आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी व्यक्त केला आहे.

# पाणीमीटर लावलेल्यांना आता बिल?

■ **पाणीपुरवठा विभागाला प्रस्ताव देण्याच्या सूचना**

**पुणे :** 'शहरातील ज्या भागात महापालिकेने पाण्याचे मीटर बसविले आहेत. त्या नागरिकांकडून मीटरने पाणीपट्टी घ्यावी, असा प्रस्ताव तयार करून स्थायी समितीसमोर मान्यतेसाठी ठेवावा,' अशा सूचना महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी पाणीपुरवठा विभागाला दिल्या आहेत. त्यानुसार हा प्रस्ताव तयार करण्यात आला असून, मान्यतेसाठी स्थायी समितीसमोर ठेवण्यात आला आहे. पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांनी या माहितीला दुजोरा दिला.

शहरात गेल्या आठ वर्षांपासून समान पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू आहे. या योजनेच्या माध्यमातून नागरिकांना पाणीपुरवठा करण्यासाठी पाण्याचे मीटर लावले जात आहेत. शहरातील ज्या पाणीपुरवठा झोनमध्ये ९० टक्के मीटर बसविले आहेत, त्या भागात यंदापासून ही बिले दिली जाणार आहेत. तसेच, ज्यांना मीटरने पाणीपुरवठा केला जाणार आहे, त्यांच्या मिळकतकरात आकारण्यात येणारी पाणीपट्टी रद्द केली जाणार आहे. ही पाणीपट्टी टेलिस्कोपिक दराने आकारली जाणार आहे. त्यामुळे अधिक वापर, अधिक बिल या तत्त्वावर आकारणी होईल. यामुळे शहरातील पाण्याचा अनावश्यक वापर कमी होण्यास मदत होणार आहे.

समान पाणीपुरवठा योजनेंतर्गत शहरातील स्वतंत्र घरे, निवासी सोसायट्यांना पाणीमीटर बसविण्यात येत आहेत. आतापर्यंत सुमारे २ लाख ८२ हजार पाणीमीटर बसविण्यात येणार असून, त्यांपैकी ६० टक्क्यांहून अधिक पाण्याचे मीटर बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे. महापालिकेने शहरात १४१ झोन तयार केले आहेत. त्यांपैकी ४७ झोनचे काम पूर्ण झाले आहे. काही झोनमध्ये पाणीपुरवठा विभागाकडून ९० टक्के पाणीमीटर बसविण्यात आले आहेत. या मीटरद्वारे पाण्याची मोजणी केली असता, अनेक ठिकाणी प्रतिव्यक्ती ५०० ते ८०० लिटर प्रतिदिन वापर असल्याचे समोर आले आहे. प्रत्यक्षात या योजनेंतर्गत प्रतिव्यक्ती १३५ लिटर पाणी वापरणे बंधनकारक आहे. त्यामुळे निकषापेक्षा जास्त पाणीवापर होत असल्याने हा वापर कमी करण्यासाठी मीटरद्वारे पाणीपट्टी आकारण्याचे नियोजन महापालिकेने केले आहे. त्यानुसार त्याची अंमलबजावणी केली जाणार आहे.

मीटरद्वारे पाणीपट्टी आकारताना महापालिका १ हजार लिटर पाण्यासाठी साडेसात रुपये शुल्क आकारणार आहे. एखाद्या कुटुंबात सहा ते सात व्यक्ती असल्यास त्यांनी दररोज पाणीवापराच्या निकषानुसार पाणी घेतल्यास केवळ साडेसात रुपयांचे पाणी बिल महापालिकेकडे भरावे लागणार आहे. मात्र, निकषापेक्षा जास्त पाणी घेतल्यास त्याचे जादाचे पैसे मोजावे लागणार आहेत.

# वीज निर्मितीसाठी दीर्घकालीन उपाययोजनांवर भर - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई, दि. ०४: कोळसा उत्पादन ते वापरापर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर सखोल विश्लेषण करून, सर्वोत्तम दर्जाचा कोळसा, कमी खर्चात, योग्य वेळेत मिळावा यासाठी शासन प्रयत्नशील आहे. 'महानिर्मिती'ने गारे पेल्मा- दोन जीपी-२ कोळसा खाणीसाठी अभ्यासपूर्ण प्रस्ताव तयार करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली कोळसा खाणीसंदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ. श्रीकर परदेशी, महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी. यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, वीज निर्मितीसाठी विविध कंपन्यांकडून मिळणारा कोळसा चांगल्या दर्जाचा मिळावा, तसेच तो वेळेत मिळावा यासाठी शासन सतत प्रयत्नशील आहे. छत्तीसगड येथील रायगढ जिल्ह्यातील गारे पेल्मा दोन कोळसा खाणीला शासनाच्या सर्व परवानग्या प्राप्त करून 'महानिर्मिती'ने कोळसा उत्पादनाबाबत सर्वसमावेशक असा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करून त्याला मान्यता घ्यावी. वीज निर्मिती करताना उत्पादन खर्च कमी करून ग्राहकांना कमी दरात वीज उपलब्ध व्हावी, यासाठी 'महानिर्मिती'कडून कार्यवाही करण्यात यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

## वाहतूक पोलिसाला मारहाण

**पुणे :** उंड्री चौकामध्ये वाहतूक नियमनासाठी तैनात पोलिसांवर एका व्यक्तीने हल्ला करून मारहाण केली. सरकारी कामात अडथळा आणून त्याने पोलीस कर्मचाऱ्याला शिवीगाळ केली. त्यानंतर पोलिसाच्या कानशिलात लगावून दुसऱ्या अंमलदाराच्या शर्टाची कॉलर पकडून जिवे मारण्याची धमकीही दिली. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले असून, त्याच्याविरुद्ध काळेपडळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. गणेश लक्ष्मण कदम (वय ४०) असे ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव आहे. वाहतुकीला अडथळा निर्माण केल्याप्रकरणी त्याला पोलीस अंमलदारांनी समजावून सांगितले होते. त्याचा राग आल्यामुळे त्याने पोलिसांवरच हल्ला केल्याची माहिती पोलिसांनी दिली. उमेश राजू दाभेकर हे गेल्या तीन वर्षांपासून कोंढवा वाहतूक विभागात कार्यरत आहेत. १ एप्रिलला ते अशोक म्हस्के यांच्यासोबत उंड्री चौकात कर्तव्यावर होते. शंकर मंदिराजवळ एकजण लोकांना शिवीगाळ करत असल्याची माहिती सायंकाळी पावणेसहाच्या सुमारास एका रिक्षाचालकाने पोलिसांना दिली. कडेला लावलेल्या दुचाकी तो रस्त्यावर ढकलत होता. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. तेव्हा मंदिराजवळ असलेल्या दुचाकींना लाथ मारून एकजण त्या रस्त्यावर पाडत असल्याचे, तसेच परिसरातून जाणाऱ्या नागरिकांना मोठ्याने ओरडून शिवीगाळ करत असल्याचे दिसले. पोलिसांनी वाहने बाजूला करण्यास सुरुवात केली असता, त्याने संतापून दाभेकर यांची कॉलर पकडून त्यांच्या कानशिलात लगावली.

# नव तंत्रज्ञानाचा वापर करून महसूल विभाग अधिक सक्षम करावा - महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**पुणे :** महसूल विभाग हा शासनाचा चेहरा असून पारदर्शक व गतिमान कामकाजा सोबतच नवतंत्रज्ञानाचा वापर करून, महसूल विभाग अधिक सक्षम करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले महसूल क्षेत्रिय अधिकाऱ्यांच्या दोन दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

मुख्यमंत्र्यांनी महसूल विभागाच्या शंभर दिवस कृती कार्यक्रमाच्या अनुषंगाने दिलेल्या निर्देशानुसार येथील हॉटेल ऑर्चिड येथे दोन दिवसीय महसूल क्षेत्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेत महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, छत्रपती संभाजी नगर विभागीय आयुक्त दिलीप गावडे, नागपूर विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, कोकण विभागीय आयुक्त विजय सूर्यवंशी, अमरावती विभागीय आयुक्त श्वेता सिंगल, मुद्रांक नोंदणी महानिरीक्षक रवींद्र बिनवडे, जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख डॉ. सुहास दिवसे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. महसूल मंत्री श्री बावनकुळे म्हणाले, महसूल विभागाने लोकाभिमुख व पारदर्शक काम करताना अधिकाऱ्यांनी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवण्यावर भर द्यावा, एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) सारख्या या नवमाध्यमांचा वापर करुन नाविन्यपूर्ण उपक्रम राबवावेत. या कामात आपला सहभाग अधिक असला पाहिजे, समाजाप्रती आपले काही देणे असून आपले कर्तव्य समजून प्रत्येकाने काम करावे, इतर राज्यात झालेल्या नाविन्यपूर्ण कामाप्रमाणे आपल्या राज्यात सुद्धा नवीन संकल्पना राबवून कामे व्हावीत अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

# 'जोशी रेल्वे संग्रहालया'मध्ये पुणे मेट्रोच्या प्रतिकृतीची निर्मिती

**पुणे :** रेल्वे प्रतिकृतींचे संग्रहालय असलेल्या 'जोशीज् म्युझिअम ऑफ मिनीएचर रेल्वेज'मध्ये पुणे मेट्रोच्या प्रतिकृतीची निर्मिती करण्यात आली असून, ट्रेन मॉडेलिंगचा छंद जोपासू पाहणाऱ्यांसाठी निर्माण करण्यात आलेल्या संग्रहालयाच्या संकेतस्थळावर एक विशेष विभाग विकसित करण्यात आला आहे. जोशी रेल्वे संग्रहालयाच्या २७ व्या वर्धापन दिनी भिलवडी येथील प्रसिद्ध चितळे डेअरीचे संचालक गिरीश चितळे यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन करण्यात आले. संग्रहालयाचे देवव्रत जोशी आणि रवी जोशी या वेळी उपस्थित होते. चितळे म्हणाले, 'कला आणि विज्ञान यांचा अनोखा मिलाफ असलेले हे संग्रहालय आपल्या जीवनाचा महत्त्वाचा घटक असलेल्या रेल्वेच्या विविध प्रकारांची माहिती अतिशय रंजकपणे उपलब्ध करून देते. भारतातील मेट्रोचे जाळे वाढत आहे. तसेच भारतीय रेल्वेचे आधुनिकीकरण आंतरराष्ट्रीय दर्जाचे होते आहे. त्यामुळे तरुण पिढीला येथील चालते-फिरते रेल्वेचे प्रकार समजण्यास आणखी सोपे झाले आहे.

# दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या विरोधातील आंदोलन भोवलं

**पुणे :** दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या आडमुठ्या भूमिकेमुळे तनिशा भिसे यांचा मृत्यू झाला, असा आरोप झाल्यानंतर भाजपाच्या महिला कार्यकर्त्यांनी डॉ. सुश्रुत घैसास यांच्या नातेवाईकच्या खासगी रुग्णालयाची तोडफोड केली. या प्रकरणी आता भाजपाच्या महिला कार्यकर्त्यांवर दंगलीचे गुन्हे दाखल करणअयात आले आहेत. भाजपाचे आमदार अमित गोरखे यांचे स्वीय सहाय्यक सुशांत भिसे यांच्या पत्नी तनिशा भिसे यांना २८ मार्च रोजी प्रसूतीसाठी दीनानाथ रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र रुग्णालयाने आधी २० लाख आणि नंतर १० लाख आगाऊ भरण्यास सांगितले. पैसे न भरल्यामुळे रुग्णालयाने उपचार करण्यास नकार दिला, असा आरोप केला जात आहे.

सदर प्रकरण बाहेर आल्यानंतर काल दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाबाहेर विविध पक्षांच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन केले. त्यानंतर भाजपाच्या वतीनेही आंदोलनाचा पवित्रा घेतला. तनिशा भिसे यांच्याकडे मंगेशकर रुग्णालयातील डॉक्टर सुश्रुत भिसे यांनी पैशांची मागणी केल्याचा आरोप भिसे कुटुंबियांनी केला होता. त्यामुळे डॉ. घैसास यांना जाब विचारण्यासाठी भाजपाच्या महिला कार्यकर्त्यांनी आंदोलन केले. मात्र त्यांनी घैसास यांच्या नातेवाईकांच्या रुग्णालयाची तोडफोड केली.

पुण्यातील नवसह्याद्री सोसायटी येथील डॉ. चिन्मय घैसास यांच्या अश्विनी नर्सिंग होमवर धाड टाकून महिला आंदोलकांनी तोडफोड केली. मात्र आता भाजपाच्या महिला पदाधिकाऱ्यांना हे आंदोलन भोवले आहे.

# भूकंपग्रस्त गावांतील वनीकरणाची उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्याकडून प्रशंसा

■ **अवकाळी पावसामुळे झालेल्या पीक नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करावेत**

लातूर, दि. ४ : लातूर जिल्ह्यातील २१ भूकंपग्रस्त गावांच्या मूळ गावठाणात वन विभाग आणि सामाजिक वनीकरण विभागाच्या माध्यमातून विविध योजनांतर्गत ६८ हेक्टर क्षेत्रावर वृक्षलागवड करण्यात आली आहे. या उपक्रमाचे महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी प्रशंसा केली. तसेच, या वृक्षांचे संगोपन करण्यासाठी संबंधित ग्रामपंचायतींना एकत्रित मार्गदर्शक सूचना देऊन त्यांची मदत घ्यावी, असे त्यांनी सांगितले.

उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या उपस्थितीत लातूर शासकीय विश्रामगृहात झालेल्या आढावा बैठकीत भूकंपग्रस्त गावांतील वनीकरण, जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था, अंमली पदार्थविरोधी कार्यक्रम, ऊसतोड कामगारांचे प्रश्न आदी विषयांवर चर्चा झाली. या बैठकीला पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, रोहयो उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, पुनर्वसन उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी, समाज कल्याण सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी जावेद शेख, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रमेश जाधव, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, अविनाश कोरडे, तहसीलदार सौदागर तांदळे, घनश्याम अडसूळ, प्रसाद कुलकर्णी, शिवाजी कदम, वन विभागाच्या सहायक वनसंरक्षक वृषाली तांबे, सामाजिक वनीकरण विभागाचे सहायक वनसंरक्षक मदन क्षीरसागर यांच्यासह इतर विभागांचे अधिकारी आणि विविध संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

भूकंपामुळे उद्ध्वस्त झालेल्या गावठाणामध्ये वन विभाग आणि सामाजिक वनीकरण विभागाच्या माध्यमातून वृक्षलागवड करून या गावांचे रूप पालटण्याचा प्रयत्न सुरू आहे. आतापर्यंत वन विभागाने ११ गावांमध्ये ४६ हेक्टर क्षेत्रावर, तर सामाजिक वनीकरण विभागाने १० गावांमध्ये २२ हेक्टर क्षेत्रावर वनीकरण केले आहे. यात रोपवन, फुलपाखरू उद्यान, कॅक्टस गार्डन आणि घनवन यांचा समावेश आहे. या उपक्रमाचे कौतुक करताना उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी ग्रामपंचायतींना वृक्षांची निगा राखण्यासाठी मार्गदर्शन करण्याच्या सूचना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच, भूकंपग्रस्त गावांतील गावठाणच्या उर्वरित क्षेत्रावर वृक्षलागवडीचे नियोजन करून आगामी पावसाळ्यात हे काम पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी प्रत्येक वसतिगृहात दक्षता समिती स्थापन करावी, असे उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले. या समितीत स्थानिक प्रशासनातील अधिकारी आणि संबंधित पोलीस स्टेशनचे अधिकारी यांचा समावेश असावा. या समितीने पालकांसमवेत नियमित बैठका घेऊन विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशा सूचना त्यांनी दिल्या. जिल्ह्यात ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठी चार वसतिगृहे कार्यान्वित झाल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले आणि या विद्यार्थ्यांना सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले.

## येत्या जूनपासून राज्यात एआय विद्यापीठ : चंद्रकांत पाटील

**पुणे :** कृत्रिम बुद्धिमत्तेचे (एआय) वाढते महत्त्व लक्षात घेऊन राज्य सरकार राज्यात एआय विद्यापीठ सुरू करणार आहे. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली कृती समितीची स्थापनाही करण्यात आली आहे. येत्या जूनमध्ये 'एआय' विद्यापीठ सुरू होईल, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

महाराष्ट्रीय मंडळाचे चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय (सीएसीपीई) आणि एमईएसचे गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स यांच्यातर्फे आयोजित 'बीसी टू एडी' (बिफोर चॅट जीपीटी टू एआय डिसरप्शन) या परिषदेचे उद्घाटनावेळी पाटील बोलत होते. महाराष्ट्रीय मंडळ, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष एअर मार्शल (नि.) भूषण गोखले, एमईएसचे उपाध्यक्ष प्रदीप नाईक, एमईएसच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष बाबासाहेब शिंदे, महाराष्ट्रीय मंडळाचे सचिव रोहन दामले, शिक्षण संचालक नेहा दामले, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनावणे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. संजय तांबट, महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचे मुख्य मार्गदर्शक डॉ. विवेक सावंत, सीएसीपीईचे प्राचार्य डॉ. सोपान कांगणे, आबासाहेब गरवारे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोर देसरडा, परिषदेच्या समन्वयिका डॉ. श्रद्धा नाईक या वेळी उपस्थित होते.

पाटील म्हणाले, 'आज देशात प्रत्येक क्षेत्रात आर्टिफिशीयल इंटेलिजन्स वापराचे प्रमाण वाढत आहे. या क्षेत्रात देशाने उशिराने सुरुवात केली असली, तरी नजीकच्या भविष्यात आपला देश त्यामध्ये मोठी प्रगती करेल. आता प्रत्येक क्षेत्रातच 'एआय'चा वापर वाढत आहे. राज्यामध्ये नवीन सरकार सत्तेत आल्यानंतर भविष्यकाळात 'एआय'च्या वापरावर अधिक भर देण्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारचा प्रयत्न आहे.'

काही दिवसांपूर्वी शिर्डीमध्ये भाजपच्या अधिवेशनात राज्याचे माहिती-तंत्रज्ञानमंत्री आशिष शेलार यांच्याबरोबर चर्चा सुरू असताना त्यांनी 'एआय'चा वापर, उपयुक्ततेचे प्रात्यक्षिक दाखवले. राज्यात विविध शहरांतील पालकमंत्री नेमण्याची प्रक्रिया झाली नव्हती. शेलार यांनी 'एआय'च्या माध्यमातून पालकमंत्र्यांची यादी करून दाखवली. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तिथे आले आणि त्यांना ही यादी दाखवल्यावर त्यांनी ही यादी सध्याच्या राजकीय परिस्थितीनुसार करण्याची सूचना केली, त्यानुसार यादी काढली. त्यामुळे सध्याचे पालकमंत्री हे 'एआय'चा वापर करून नेमण्यात आल्याचा किस्सा पाटील यांनी सांगितला.

## शिक्षकांच्या सिंगापूर दौऱ्यामुळे अध्यापन पद्धती अधिक प्रभावी होण्यास मदत -मंत्री दादाजी भुसे

**मुंबई :** जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांना सिंगापूर येथील आंतरराष्ट्रीय अभ्यास दौऱ्यामुळे विकसित देशातील शाळांमध्ये सुरू असलेले अध्यापनाचे नाविन्यपूर्ण प्रयोग, पद्धती आणि आधुनिक तंत्रज्ञान समजून घेण्याची संधी प्राप्त झाली आहे. या दौऱ्याचा राज्यातील शिक्षकांची अध्यापन पद्धती अधिक प्रभावी होऊन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना लाभ होईल, असा विश्वास शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी व्यक्त केला.

समग्र शिक्षा, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांच्यावतीने जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने चालवल्या जाणाऱ्या 'स्टार्स' (स्ट्रेंथनिंग टिचिंग लर्निंग अँड रिझल्ट्स फॉर स्टेट्स) प्रकल्पांतर्गत राज्यातील जिल्हा परिषद शाळांच्या शिक्षकांसाठी २२ ते २७ मार्च दरम्यान सिंगापूर येथे अभ्यास दौरा पार पडला. जागतिक सर्वोत्तम शिक्षण पद्धती स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये आणणे, नावीन्यपूर्ण शैक्षणिक पद्धती आणि यशस्वी प्रशासकीय पद्धतींचा अभ्यास करणे, जागतिक स्तरावरील विविध सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक, ऐतिहासिक, भौगोलिक वातावरणाचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन नवीन दृष्टीकोन प्राप्त करणे व स्वतःच्या शाळेत नवीन शैक्षणिक व प्रशासकीय बाबींची अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न करणे हा या दौऱ्याचा उद्देश होता.

शिक्षकांमध्ये नेतृत्वगुण व व्यावसायिक कौशल्ये विकसित करण्यावर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये भर देण्यात आला आहे. त्यानुसार शिक्षकांना या दौऱ्यातून आंतरराष्ट्रीय शिक्षणपद्धती विषयी थेट शिकण्याची संधी मिळाली. यामध्ये आधुनिक अध्यापन पद्धती, वर्ग व्यवस्थापन तंत्रे व नाविन्यपूर्ण प्रशासकीय पद्धतींचा समावेश होता. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई येथील सहायक संचालक (कार्यक्रम) सरोज जगताप यांच्या नेतृत्वाखाली या दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (एससीईआरटी) पुणे येथील उपसंचालक ज्योती शिंदे यांच्यासह महाराष्ट्रातील विविध जिल्हा परिषद शाळांमधील ४८ शिक्षकांनी या अभ्यास दौऱ्यात सहभाग घेतला.

प्रायोगिक शिक्षण- बलस्थाने, आव्हाने, प्रकार, संरचना, शिक्षकांनी करावयाची पूर्व तयारी व यश प्राप्ती, शिक्षणातील अध्यापन शास्त्रीय दृष्टीकोन, विद्यार्थ्यांची अध्यापनातील रूची टिकवून ठेवण्याची प्रभावी तंत्रे व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सहशिक्षणाचे नावीन्यपूर्ण धोरण या मुद्यांवर प्रिन्सिपल्स अकॅडमी इन्क (पीएआय), सिंगापूर या शिक्षण नेतृत्व, अभ्यासक्रम व अध्यापन शास्त्रात विशेष प्राविण्य असलेल्या संस्थेमार्फत शैक्षणिक साधनांचा वापर करत प्रशिक्षण देण्यात आले.

## मुळा नदीकाठी ३३ झाडांची विनापरवाना तोड

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने मुळा नदी सुधार प्रकल्पाचे काम सुरू करण्यात आले असताना नदीकाठावरील ३३ झाडे विनापरवाना तोडल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकरणी उद्यान विभागाने सांगवी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याबाबत महापालिकेचे उद्यान सहायक अनिल गायकवाड यांनी महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियमनुसार फिर्याद दिली आहे. त्यानुसार अज्ञात व्यक्तींविरोधात सांगवी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेने २०० कोटींचे कर्जरोखे उभारून मुळा नदी सुधार प्रकल्प हाती घेतला आहे. त्यात वाकड बायपास ते सांगवी येथील पुलापर्यंतचे काम पहिल्या टप्प्यात करण्यात येत आहे. हे काम सुरू असताना पिंपळेनिलख येथील अवैध वृक्षतोड झाल्याची तक्रार पर्यावरणप्रेमींनी केली होती. त्यानुसार उद्यान विभागाने नदीकाठी जाऊन पाहणी केली.

पिंपळेनिलख येथील पंचशीलनगर,इंगवलचौकाशेजारील मुळा नदी काठावरील एकूण २१ वृक्ष तोडल्याचे दिसून आले. त्यात दोन सुबाभूळ, एक कडुलिंब, १७ काटेरी बाभुळ या झाडांचा समावेश आहे. तर, पिंपळे निलख स्मशानभूमी शेजारील बारा झाडे तोडण्यात आली आहेत. त्यात दोन काटेरी बाभूळ, तीन सुबाभूळ, पाच करंज, एक उंबर, एक विलायची चिंच या झाडांचा समावेश आहे. नदीकाठी विनापरवाना वृक्षतोड झाल्याचे दिसून आले. याप्रकरणी सांगवी पोलीस ठाण्यात तक्रार दिली असल्याचे उद्यान विभागाचे सहायक आयुक्त उमेश ढाकणे यांनी सांगितले.

### वांद्रे शासकीय वसाहत: भूखंडाच्या निकषासाठीची समिती लवकरात लवकर गठीत करा

**मुंबई :** वांद्रे येथील शासकीय वसाहतीतील अधिकारी कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठीच्या भूखंडाबाबत निकष निश्चित करण्यासाठी समिती गठीत करण्याचा निर्णय झाला आहे. ही समितीत लवकरात लवकर गठीत करण्यात यावी, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथे वांद्रे येथील शासकीय वसाहतीतील अधिकारी कर्मचाऱ्यांच्या गृहनिर्माण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्र्यांची भेट घेतली. यावेळी झालेल्या बैठकीत यासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीस माजी आमदार किरण पावसकर, उपमुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, बांधकाम विभागाचे सचिव संजय दशपुते आणि गृहनिर्माण संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

या सहकारी संस्थेला भूखंड उपलब्ध करून देण्याबाबत निर्णय झाला असल्याचे पावसकर यांनी यावेळी सांगितले. या भूखंडाचा तपशील अधिकारी कर्मचारी यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेची अर्हता, निकष निश्चित करण्यासाठी ऑक्टोबर २०२४ मध्ये शासन निर्णय जाहिर करण्यात आला आहे. त्यानुसार ही लवकरात लवकर गठीत करण्याची मागणी यावेळी पदाधिकाऱ्यांनी केली.

## पुणे विमानतळावरून प्रवाशांची कोटींची 'उड्डाणे'

■ **एक कोटी प्रवाशांचा टप्पा पार**

**पुणे :** पुणे विमानतळाचे विस्तारीकरण, आंतरराष्ट्रीय विमानांची उड्डाणे आणि नवीन टर्मिनल यामुळे प्रवासी संख्येत वाढ झाली असून, गेल्या वर्षभरात प्रथमच एक कोटी प्रवाशांचा टप्पा ओलांडला गेला आहे. त्यामध्ये प्रवाशांनी आंतरराष्ट्रीय हवाई प्रवासापेक्षा देशांतर्गत प्रवासाला पसंती दिल्याचे स्पष्ट झाले आहे.

या विमानतळावरून २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या तुलनेत २०२४-२५ मध्ये १०.६६ टक्के प्रवाशांची वाढ झाली आहे, तर विमान वाहतूक ७.५ टक्क्यांनी वाढली आहे. या विमानतळाचे विस्तारीकरण, उडाण योजनेंतर्गत देशांतर्गत उड्डाणे, आंतराष्ट्रीय विमानांची उड्डाणे, नवीन टर्मिनलमुळे विमान वाहतूक वाढली आहे. तसेच, प्रवाशांसाठी असलेल्या डीजी यात्रा सुविधेमुळे हवाई प्रवासाला पसंती देण्यात आली आहे. या विमानतळावरून वर्षभरात एक कोटी प्रवाशांनी प्रवास केला आहे. गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात नऊ लाख ५४ हजार प्रवाशांनी प्रवास केला, असून यामध्ये नऊ लाख २० हजार देशांतर्गत, तर ३३ हजार ३३७ आंतरराष्ट्रीय हवाई प्रवाशांचा समावेश असल्याचे केल्याचे विमानतळ प्रशासनाकडून सांगण्यात आले.

विमानांच्या वाहतुकीतही ७.५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या तुलनेत साडेचार हजार विमानांची उड्डाणे वाढली आहेत. गेल्या वर्षभरात या विमानतळावरून ६८ हजार ५५७ विमानांची वाहतूक झाली आहे. दरम्यान, या विमानतळावरून मालवाहतुकीत ८.८५ टक्के वाढ झाली आहे.

पुणे विमानतळावरून सद्यःस्थितीत देशांतर्गत ३५ ठिकाणी उड्डाणे होत आहेत. भोपाळ, त्रिवेंद्रम, चेन्नई, इंदोर, अहमदाबाद, देहराडून येथे विमानसेवा सुरू करण्यात आल्याने प्रवाशांची संख्या वाढली आहे.

## महिलेच्या मृत्यूप्रकरणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे चौकशीचे आदेश

**मुंबई :** पुणे येथील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात तातडीने उपचार न मिळाल्याने श्रीमती तनिषा भिसे या भगिनीला आपला प्राण गमवावा लागल्याची घटना अत्यंत दुर्दैवी असून, शासनाने याची गंभीर दखल घेतली आहे. तज्ज्ञ डॉक्टरांच्या समितीद्वारे या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत.

या दुर्दैवी घटनेची गांभीर्याने दखल घेत उपमुख्यमंत्री पवार यांनी पुणे जिल्हाधिकाऱ्यांकडून याबाबतची संपूर्ण माहिती घेतली आहे. आरोग्य विभागाने तातडीने, पारदर्शक आणि निष्पक्षपणे चौकशी पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. रुग्णालय प्रशासनाने माध्यमांसमोर त्यांचे म्हणणे मांडले असले, तरी शासन या प्रकरणाचा सर्व संबंधित घटकांची सखोल चौकशी करून योग्य ती कारवाई करेल. या घटनेबाबत आंदोलन करणाऱ्या व्यक्ती, संस्था आणि संघटनांच्या भावना शासनाने समजून घेतल्या आहेत. चौकशीच्या निष्कर्षानुसार दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाईल. तसेच अशा घटना भविष्यात घडू नयेत, यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्याच्या स्पष्ट सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. सर्व नागरिकांनी संयम बाळगावा आणि प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री पवार यांनी केले आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज पुण्यतिथी कार्यक्रमाच्या नियोजनाचा आदिती तटकरे यांनी घेतला आढावा

**रायगड :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३४५ व्या स्मृतिदिन कार्यक्रमास दि.१२ एप्रिल रोजी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा रायगडावर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाच्या पूर्व तयारीचा आढावा महिला व बालविकास मंत्री कु.आदिती तटकरे यांनी आज महाड येथे आयोजित बैठकीत घेतला.

यावेळी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नेहा भोसले, अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवतरे, पुरातत्व विभागाचे अधिकारी राजेश दिवेकर, स्थानिक उत्सव समितीचे अध्यक्ष रघुजीराजे आंग्रे, कार्यवाहक सुधीर थोरात, महाड नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षा स्नेहल जगताप, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाचे सदस्य आणि विविध विभागाचे संबंधित अधिकारी आदी उपस्थित होते.

यावेळी महिला व बालविकास मंत्री कु. तटकरे यांनी प्रशासन, पोलीस, पुरातत्व विभाग तसेच स्थानिक समित्या यांनी परस्पर समन्वयाने कार्यक्रमाचे दिमाखदार नियोजन करावे असे निर्देश दिले. एप्रिल महिन्यात असलेल्या उन्हाची तीव्रता लक्षात घेऊन पुरेश्या प्रमाणात पिण्याचे पाणी, औषधे साठा ठेवावा. रायगड वर येणाऱ्या महिला व पुरुष यांच्यासाठी पुरेश्या प्रमाणात स्वच्छता गृह उपलब्ध करून द्यावे.

## अपहृत मुलाची दोन तासांत सुटका

**पिंपरी :** शहरात रोजगारासाठी आलेल्या बुलडाणा येथील दाम्पत्याच्या मुलाचे चिंचवड येथून अपहरण झाल्याची तक्रार दाखल होताच खंडणीविरोधी पथकाने दोन तासांत त्याची सुटका केली. त्यांच्याच गावातील ओळखीच्या व्यक्तीने मुलाचे अपहरण केल्याचे उघडकीस आले. मात्र, अपहरणामागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. गजानन सुपडा पानपाटील (वय २५, रा. पुनई, जि. बुलडाणा) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. मुलाच्या आईने चिंचवड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. खंडणीविरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक देवेंद्र चव्हाण यांनी दिलेल्या माहितीनुसार, बुलडाणा येथील दाम्पत्य काही दिवसांपूर्वी आठ वर्षांच्या मुलासह पिंपरी-चिंचवड शहरात कामासाठी आले होते.

## अनधिकृत होर्डिंगवर आता धडक कारवाई, पीएमआरडीए प्रशासनाचा निर्णय

**पुणे :** पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) अनधिकृत होर्डिंग काढण्यासाठी पुढील आठवड्यापासून धडक मोहीम हाती घेण्याचे निश्चित केले आहे. हिंजवडी परिसरासह राष्ट्रीय आणि राज्य महामार्गांसह अन्य प्रमुख रस्त्यांवरील अनधिकृत होर्डिंग काढण्यात येणार आहेत.

'पीएमआरडीए'च्या कार्यालयात सहआयुक्त डॉ. दीप्ती सूर्यवंशी-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली होर्डिंगधारक आणि होर्डिंग संघटनांची बैठक झाली. त्या बैठकीची माहिती डॉ. दीप्ती सूर्यवंशी-पाटील यांनी दिली. उपजिल्हाधिकारी प्रमोद कुदळे, तहसीलदार रवींद्र रांजणे आणि सचिन मस्के, सहायक नगररचनाकार राहुल गिते, शाखा अभियंता विष्णू आव्हाड, ऋतुराज सोनवणे, दीप्ती घुसे, विशाल भोरे यांच्यासह होर्डिंग संघटनेचे अध्यक्ष प्रकाश जमदाडे, उपाध्यक्ष शेखर मते उपस्थित होते.

हवामान विभागाकडून पुढील काही दिवसांत अवकाळी, वादळी वाऱ्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. त्यामुळे धोकादायक होर्डिंग काढण्याची आणि प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय नव्याने कोणतेही आकाशचिन्ह उभारण्यात येणार नाही, याची अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी, अशी सूचना या बैठकीत करण्यात आली. होर्डिंगधारकांनी ८ एप्रिलपर्यंत परवानगीसाठी दाखल केलेल्या प्रस्तावांच्या प्रती कार्यालयात सादर करण्याची सूचना करण्यात आली आहे. प्रस्ताव सादर न करणाऱ्यांचे होर्डिंग अनधिकृत ठरवून त्यांवरील कारवाईच्या टप्प्याला प्रारंभ होणार आहे. रहदारीच्या जागेसह मुख्य चौकातील होर्डिंग काढण्यात येणार असून, दुर्घटना झाल्यास होर्डिंगधारकाला जबाबदार धरण्यात येणार आहे.

हिंजवडी परिसर, हवेली तालुका, वाघोली, मांजरी, नऱ्हेसह सर्व राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, पुणे-सातारा रस्ता, पौड रस्ता, हडपसर-दिवे घाट, पुणे-सोलापूर रस्ता, पुणे-नाशिक रस्ता, पुणे-अहिल्यानगर रस्ता, सूस रस्ता, तळेगाव-चाकण-शिक्रापूर रस्त्यांबरोबरच वर्दळीच्या ठिकाणचे होर्डिंग काढून टाकण्यात येणार आहेत, असे सूर्यवंशी-पाटील यांनी सांगितले.